|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## प्रवेश पात्रता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/०६/प्रवेश/ ६८ /२०२५ दि.११.०७.२०२५

**परिपत्रक क्र.४३/ २०२५**

**प्रति,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, अभियांत्रिकी
महाविद्यालये यांचे प्राचार्य तसेच मान्यता प्राप्त परिसंस्था यांचे संचालक
यांना..

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती पॅटर्न (C.B.C.S.) च्या **बी.सी.ए, बी.बी.ए , बी.एम.एस आणि बी.ई** च्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षात प्रवेश देण्याबाबत.

आपणांस विदितच आहे की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कला, वाणिज्य आणि विज्ञानच्या **बी.ए, बी.कॉम** आणि **बी.एस्सी** वर्गांना आणि **बी.सी.ए, बी.बी.ए, बी.एम.एस** आणि **बी.ई** या वर्गांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार अभ्यासक्रम लागू करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कला, वाणिज्य आणि विज्ञानच्या वर्गांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार अभ्यासक्रम लागू झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती पॅटर्न (C.B.C.S.) च्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षात प्रवेश देण्याबाबत परिपत्रक **क्र.४०/२०२५**, दि.०७.०७.२०२५ अन्वये सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये कळविण्यात आले आहे.

आता या परिपत्रकान्वे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून **बी.सी.ए, बी.बी.ए , बी.एम.एस** आणि **बी.ई** या वर्गांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार अभ्यासक्रम लागू करण्यात आले असल्याने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये किंवा त्यापुर्वी पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती पॅटर्न (**C.B.C.S**) **बी.सी.ए, बी.बी.ए , बी.एम.एस** आणि **बी.ई वर्गांचे** जे विद्यार्थी व्दितीय वर्षात काही कारणास्तव प्रवेशीत होऊ शकले नाही अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये संबंधित महाविद्यालये तसेच परिसंस्थांनी तासिका आणि प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्याच्या अटीवर व्दितीय वर्षात **बी.सी.ए, बी.बी.ए , बी.एम.एस** आणि **बी.ई C.B.C.S** (पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती ) अभ्यासक्रमांना प्रवेश द्यावेत, असे प्रवेश घेतलेले विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये तृतीय वर्षाच्या **C.B.C.S** (पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती ) प्रवेशासाठी संबंधित महाविद्यालयांनी तासिका आणि प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्याच्या अटीवर पात्र असतील.मात्र ही शैक्षणिक सवलत फक्त शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये व्दितीय वर्षासाठी आणि शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये तृतीय वर्षाकरीताच लागू राहील याची नोंद घ्यावी.

तेव्हा, उपरोक्त बाब महाविद्यालयांतील विद्यार्थी / विद्यार्थ्यांनीसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

आपला विश्वासू,

( डॉ.विनोद प्र.पाटील )
कुलसचिव

**प्रत माहितीसाठी**

१.मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि.,जळगांव.
२) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि.,जळगांव.
३) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगांव.
४) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव.
५) मा.उपकुलसचिव, संलग्नता विभाग कबचौउमवि, जळगांव.६) समन्वयक ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि,जळगांव.